# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०६/२०२२ (सोमवार)

---

## माउजर बाळगणा—या आरोपीस अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक २६/६/२२ चे १८/०० वा पोलीस स्टेशन कन्हान परीसरात फिर्यादी हे स्टॉफ सह पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, **फारुख शेख** हा आपल्या जवळ अग्निशस्त्र बाळगुन आहे, अशा विश्वसनीय खबरेवरुन पंचासह सदर ठिकाणी जावुन रेड केली असता, आरोपीच्या राहते घरुन घरझडती दरम्यान एक लोंखडी हॅण्डमेड देशी बनावटीचा माउजर (कट्टा) किमती ४०,०००/—रु चा माल विना परवाना मिळुन आल्याने सदर नमुद आरोपी वर पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३/२५ आर्म ॲक्ट अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपी नामे— **फारुख अब्दुल शेख वय २४ वर्ष रा कांद्री खदान कन्हान जि नागपुर** यास **दिनांक २६/०६/२०२२ चे २३/१३ वा अटक करण्यात आली असुन पुढील तपास** सहायक पोलीस निरीक्षक फुलझेले पोलीस स्टेशन कन्हान मो क्र ९४०४१२३९५० हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, ज्ञानेश्वर राउत, अरविंद भगत, पोलीस नाईक शैलेश यादव, प्रणय बनाफर, चालक सफौ साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन बोरी** :— अंतर्गत तारसी ता हिंगणा ९ किमी दक्षीण, येथे दिनांक २५.०६.२२ चे २०.०० वा. दरम्यान, यातील फिर्यादी ही स्वयंपाक करीत असता फिर्यादीचा पती आरोपी नामे— निलेश उईके हा जेवणाचा कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून, तुझे माहेरच्या पैशाची दारू पितो का ? असे म्हणुन सळाखीने जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सपना निलेश उईके वय २८ वर्ष रा (प्रतिभा विनायक करनाके याच्या घरी किरायाने ) तारसी ता हिंगणा जि नागपुर यांचे रिपोर्टवरून पो स्टे बोरी येथे आरोपीविरूध्द कलम ३२४ भादवि अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोहवा/१७१ असलम मो क्र ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

## विनयभंग

**पोलीस स्टेशन मौदा :–** अंतर्गत चिचोली बस स्टॉप पुर्व १२ किमी, येथे दिनांक २४/०६/२२ चे १८.०० वा दरम्यान, यातील फियादी हे क्लास करून पायदळ घरी जात असता, यातील आरोपी याने फिर्यादीचा पाठलाग करून हात पकडला व मी तुझ्यावर प्रेम करतो ? तुझे माझ्याकडे अश्लील विडीओ आहे, ते वायरल मी वायरल करील? अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे मौदा येथे आरोपी नामे – अमित शेखर नानवटकर रा चिचोली ता मौदा विरूध्द कलम ३५४ (अ), ३५४ (ड), ५०६ भादवी सहकलम १०,१२ बाल लैगीकं. अपराधापासुन संरक्षण अधिनियम अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस उप निरीक्षक ठाकुर ७०२०८२१५३३ हे करीत आहे.

## अपघातात म ृत्यु

**पोलीस स्टेशन मौदा :–** अंतर्गत मारोडी शिवार पुर्व ०३ किमी. येथे दिनांक २६/०६/२२ चे १४.१५ दरम्यान यातील मृतक नामे– सुशिल धामणे हा भंडारा ते नागपूर रोड ने मौदा कडे पायदळ जात असता बस क्र एमएच–१३ सियु ८६५९ चे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरघाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मृतकास जखमी केले असता उपचारा दरम्यान तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सर तर्फे पो हवा मेश्राम ब न १६९ पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. मौदा येथे बस क्र एमएच–१३ सियु ८६५९ चे चालकाविरूध्द कलम २७९, ३०४ (अ) सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील सपोनि चौधरी ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९६२३८५७०६८**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर**